# माजी सैनिकांना मिळेल बदलीत प्राधान्य!

## महाराष्ट्र शासनाचा दूरगामी लाभदायक निर्णय

◆ नागपूर, २२ नोव्हेंबर

सीमेवर लढणारा सैनिक त्याचा कालावधी संपल्यावर स्वबळावर नागरी सेवेत येतो. सीमेवर तो कुटुंबापासून दूरच राहत होता. तद्वतच नागरी सेवेत आल्यावर त्याला कुटुंब जवळ हवे असते. पण त्याचा विचार नागरी सेवेत करण्यातच आला नव्हता. आता मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने पुढाकार घेत बदली प्राधान्य क्रमात माजी सैनिकांचा समावेश केला आहे. हा आदेश पारीत झाल्याने माजी सैनिकांना न्याय मिळाला असल्याची भावना शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेचे राज्य सरचिटणीस संतोष मलेवार यांनी व्यक्त केली आहे.

बदली अधिनियम २००५ मध्ये माजी सैनिकांना कुठलीही सवलत दिली नव्हती. त्यानंतर सन २०१८ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने काही प्राधान्यगट तयार केले. त्यात अनेकांचा समावेश झाला होता. पण माजी सैनिकांचा विचारच करण्यात आला नव्हता. ज्या सैनिकांनी आपले तारुण्य देशसेवेसाठी अर्पित केले, त्यांना नागरी सेवेत कुठलेही प्राधान्य मिळू नये ही बाब खटकणारी होती. म्हणूनच शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून संतोष मलेवार तसेच इतर मान्यवर संघर्ष करीत होते. त्यांच्या संघर्षाची दखल अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आणि माजी सैनिकांना बदलीसाठी प्राधान्य दिले जावे, अशा स्वरूपाचा आदेशच पारीत केला. आता प्राधान्य क्रम क्रमांक ७ मध्ये विशेष रुपात सहभागी केले आहे. हा निर्णय तातडीने व्हावा याकरिता संघटनेचे मंत्रालयीन उपाध्यक्ष उमाकांत भुजबळ, मंत्रालयीन अधिकारी ताईशेटे यांनी अथक परिश्रम घेतले.

दरम्यान, शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेला जुनी पेन्शन योजना हवी आहे. याशिवाय आश्वासीत प्रगती योजना ५-१०-१५ या स्वरूपातील हवी आहे. शासनाने ज्या प्रमाणे बदलीच्या प्राधान्य गटात माजी सैनिकांना समाविष्ट करून न्याय दिला, त्याच धर्तीवर जुनी पेन्शन योजना आणि आश्वासीत प्रगती योजनेवरही तोडगा काढावा, अशी विनंती राज्य सरचिटणीस संतोष मलेवार यांनी केली आहे. ◄(तभा वृत्तसेवा)



बदलीत प्राधान्य मिळाल्यानंतर आदेश घेण्यासाठी एकत्र आलेले संतोष मलेवार, बाजीराव देशमुख, उमाकांत भुजबळ, बाळासाहेब जाधव, संजय बोराटे, दिलावर सादीवान

### आज आम्हाला न्याय मिळाला

माजी सैनिकांची सेवा लक्षात घेता बदलीत त्यांच्या दृष्टीने लोकहितवादी भूमिका सरकारने घ्यायला हवी, म्हणून आम्ही प्रयत्नशील होतो. त्याअनुषंगाने सरकारने जो काही निर्णय केला तो खरोखरच आनंददायक आहे. आम्ही सरकारचे मनापासून आभार मानतो, अशी कृतज्ञता शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेचे राज्याध्यक्ष बाजीराव देशमुख तसेच सरचिटणीस संतोष मलेवार यांनी व्यक्त केली. ■